ORIGINAL ARTICLE ISSN:-2230-7850

Indian Streams Research Journal

*सारांश :-*

स्वांतत्र्योत्तर काळातील शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे तीन टप्पे पडतात. 1950 ते 1980 या काळात डाव्या पक्षांनी शेतमजूर व गरीब शेतकऱ्यांना संघटित करून चळवळ केली या काळातील आंदोलनाच्या मागण्या मुख्यतः जमीनदारी, सावकारी नष्ट करणे, जमीन धारणेची कमाल मर्यादा कमी करणे, शेतमजुरांच्या मजुरीत वाढ करणे, वेठबिगारी नष्ट करणे, दुष्काळी काम करणे, किमान वेतन कायदा इत्यादी होत्या.

शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या दुसऱ्या टप्प्यात शेतकरी संघटनेने प्रभावी व व्यापक चळवळ केली. या चळवळीने शेतकरी आंदोलनाचे स्वरूप बदलले. तसेच शेतकऱ्यांच्या मागण्याही बदलल्या. 1980 नंतर भारतीय शेतकऱ्यांचे प्रश्न केवळ राष्ट्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचविले. या संघटनेने जागतिकीकरणाचे म्हणजेच खुल्या अर्थव्यवस्थेचे स्वागत करून शेतीशी संबंधीत व्यवसाय नियंत्रण मुक्त करण्याची मागणी केली.

# 1980 नंतरच्या महाराष्ट्रातील उस आंदोलनातील शेतकरी चळवळींचा अभ्यास

तीसऱ्या टप्प्यात शेतकरी संघटनेचे विभाजन झाले व शेतकरी संघटना आपआपल्या पातळीवर लढू लागल्या. 2002 ते 2014 या काळात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांच्या चळवळीचे स्वरूप बदलून टाकले. रास्ता रोको, रेल रोको, चक्काजाम आंदोलनाबरोबरच हिंसात्मक आंदोलन केले. या चळवळीमध्ये शेतकरी जागृत होऊन " भीक नको पण आमच्या कामाचे दाम दया " अनुदान नको पण हमीभाव द्या असे या चळवळीचे सुत्र होते. संघटनेने अभ्यासपूर्वक मागणी केल्याने त्यांना शेतकऱ्यांकडून मोठया प्रमाणात पाठिंबा मिळाला. या काळातील चळवळीची दखल राज्य सरकार बरोबरच केंद्र सरकारलाही घ्यावी लागली. मात्र या चळवळीचे नेतृत्व मध्यम व मोठया शेतकऱ्यांनी केले. या चळवळीचा दोष म्हणजे दरवर्षी हंगाम काळातच आंदोलने केलेली दिसून येते. त्यामुळे शेतकऱ्यांच्याबरोबरच शेतकऱ्यांच्या मालकीचे साखर कारखान्यांना मोठया प्रमाणात नुकसान सोसावे लागले.

*पाडळकर व्ही.व्ही*

प्रा.डॉ.एन.डी. पाटील महाविद्यालय , मलकापूर.



*प्रस्तावना :*

भारत हा कृषीप्रधान देश आहे. या कृषीप्रधान देशात स्वांतत्र्यपुर्व काळात कृषीक्षेत्रावर अवलंबून असणाऱ्याचे प्रमाण सरासरी 85 टक्के इतके होते. तर स्वातंत्र्योत्तर काळातील हे प्रमाण 64 टक्के इतके राहिले आहे.[1] त्यामुळे शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा व समाजव्यवस्थेचा मुलभूत घटक आहे.

स्वांतत्र्यपुर्व काळात हिंदूस्थानातील शेतकऱ्यानी ब्रिटीश सत्ता व जमीनदाराविरोधात अभुतपुर्ण सत्याग्रह केले. त्यात चंपारण्य, खेडासत्याग्रह, बार्डोली, चौरीचौरा इत्यादी महत्वपूर्ण आंदोलनाचा समावेश होता. तर महाराष्ट्रात मुळशी सत्याग्रह, कोल्हापूर संस्थानातील शेतकऱ्यांनी प्रज्या परिषेदेच्या माध्यमातून केलेली आंदोलने इ. प्रभावी ठरली होती.

सन 1950 ते 1980 या काळात भारतीय कम्युनिस्ट पक्ष ( किसान सभा ) शेतकरी कामगार पक्ष, लाल निशान पार्टी समाजवादी पक्ष इत्यादी डावे पक्ष व संघटनांनी जमिन धारणेची कमाल मर्यादा खाली आणावी, अतिरीक्त जमिनीचे वाटप करावे. शेतमजूरांना किमान वेतन–जीवन वेतन द्यावे. शेतमजूरांच्या कामाचे तास नियंत्रीत करावे. इत्यादी मागण्यांसाठी गरीब शेतकरी, शेतमजूरांना संघटीत करून चळवळ सुरू केली.

महाराष्ट्रातील रामकालीन शेतकरी आंदोलनातील सर्वात प्रभावी व व्यापक चळवळ शेतकरी संघटनेने उभी केली. या चळवळीने शेतकरी आंदोलनाचे स्वरूप बदलले तसेच मागण्याही बदलल्या त्यामुळे या चळवळीत शेतकरी मोठया संख्येने सहभागी झाला व सहभागी होत आहे. परिणामी राज्याच्या आर्थीक, राजकिय धोरणामध्ये मुलगामी परिणाम झाला.

सन 1978 मध्ये शरद जोशीच्या नेतृत्वाखाली पुणे जिल्हयातील खेड तालुक्यात शेतकरी संघटनेची स्थापना झाली. या संघटनेने 1980 च्या मार्च महिन्यात कांदयाच्या भावासाठी पहिले महत्वाचे आंदोलन केले व त्यासाठी रास्ता रोको चे तंत्र वापरले. या आंदोलनामुळे संपूर्ण देशाचे लक्ष या शेतकरी संघटनेकडे व तिच्या मागण्याकडे वेधले गेले.[2] त्यानंतर नाशिक जिल्हयातील निफाड तालुक्यातील ऊस पिकवणाऱ्या शेतकऱ्यानी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली ऊसाचा भाव प्रतिटन 300 रुपये मिळावा या मागणीसाठी आंदोलनाची तयारी केली. त्यासाठी साखर कारखान्यात त्या गळीतांच्या हंगामात ऊस न देण्याचा ठराव करण्यात आला. यावेळी कारखान्यानी हे आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न केला. परंतू शेतकऱ्यानी हा लढा चालविला. यावेळी शेतकऱ्यानी ऊस न देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे कारखान्यानी पाणीपुरवठा व वीज पुरवठा खंडीत केला. परिणामी शेतकऱ्याच्यात असंतोष निर्माण झाला.[3] 10 नोव्हेंबर, ला नाशिक, धुळे, नगर जिल्हयातील शेतकऱ्यानी रास्ता रोको आंदोलन सुरु केले. तर खेरवाडी येथे रेल रोको आंदोलन सुरु केले. त्यामुळे प्रचंड तणाव वाढला. शंतता मय आदोंलन करणाऱ्या शेतकऱ्यांच्यावर पोलीसाठी लाठीमार व गोळीबार केला. त्यात दोन शेतकरी मृत्यूमुखी पडले. व अनेक शेतकरी जखमी झाले.[4] शेतकऱ्यांच्या नेत्याना अटक करण्यात आली. त्यामुळे शरद जोशीनी तुरुंगात उपोषण सुरु केले. त्यामुळे या आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी विदर्भातील कापूस शेतकऱ्यानी एक दिवसाचे चक्का जाम आंदोलन केले.[5] त्यात हजारो शेतकऱ्यानी स्वतःला अटक करुन घेतली. परिणामी सरकारने शरद जोशीशी चर्चा करण्याची तयारी दर्शविली. त्यातुन 27 नोव्हेंबर, 1980 रोजी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी ऊसाला 300/– रुपये प्रतिटन भाव देण्याची घोषणा केली.

सन 1981 मध्ये संघटनेने कर्नाटकातील निपाणी येथील तंबाखु उत्पादक शेतकऱ्याचा व्यापाऱ्याकडून होणाऱ्या लुटी विरोधात निपाणी येथे आंदोलन सुरू केले. संघटनेने सरकारला आंदोलनाची सुचना देवून विचार विनिमयासाठी मुदतही दिलेली होती. परंतू सरकारने या मागण्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे शरद जोशीच्या नेतृत्वाखाली 14 मार्च, 1981 रोजी 50 हजार शेतकऱ्यानी पुण–बेंगलोर महामार्ग अडविला. हे रास्ता रोको आंदोलन 23 दिवस चालले. 17 एप्रिलला सरकारने हजारो शेतकरी आंदोलकावर लाठीमार, अश्रुधुर करुन आदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न केला. पोलीसानी केलेल्या बेछुट गोळीबारात 12 शेतकरी, मृत्युमुखी पडले त्यामुळे सरकारने लगेच 20 एप्रिल, ला कर्नाटक सरकारने शेतकऱ्याची मागणी मान्य करुन तंबाखुची खरेदी – विक्री प्रक्रिया सहकारी संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला. [6].पुढे संघटनेने दुध आंदोलनाची हाक दिली. तसेच कर्जमुक्ती व स्वदेशी ची चळवळ हाती घेण्याचे ठरविले. त्यासाठी संघटनेने 1983 मध्ये पंढरपूर येथे संघटनेचे अधिवेशन भरविले. या अधिवेशनात कृषिमुल्य आयोगाच्या बरखास्तीची मागणी केली तर, सन 1984 च्या परभणी अधिवेशनाला महाराष्ट्राबरोबर इतर राज्यातील प्रतिनिधी हजर होते. या अधिवेशनात पुढाऱ्यांना गावबंदी, कृत्रिम धाग्याचे कापड वापरण्यावर बंदी इत्यादी ठराव करण्यात आले.[7]यानंतर संघटनेने 1984 पासून राजकिय धोरण ठरवून सत्ताधारी पक्षाच्या विरोधात इतर पक्षांना पाठींबा दिला. त्यामुळे बिगर कॉंग्रेस पक्षाचे काही उमेदवार निवडून आले.

शेतकरी संघटनेने शेतकरी चळवळीत शेतकरी स्त्रियांचा सहभाग असणे आवश्यक असे वाटून त्यानी महिला शेतकऱ्याची संघटना बांधली. त्यासाठी त्यानी महिला मेळावा, महिला अधिवेशन चांदवड येथे 9, 10 नोव्हेंबर 1986 रोजी भरविले. त्या अधिवेशनाला हजारो स्त्रिया उपस्थितीत होत्या. या अधिवेशनात स्त्रियांच्या वेतना संबंधी, शिक्षण व सामाजिक असुरक्षितता यासंबंधी ठराव केलेत.[8]

विदर्भातील शेतकऱ्यानी कापुस दरासाठी रास्ता रोको आंदोलन केले. त्यास मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळाला. तसेच संघटनेने पुढचे पाऊल म्हणून कृत्रिम धाग्याची वस्त्रे घालणाऱ्या प्रवाशाना अडविणे व त्यांच्या कपडयावर संघटनेचा शिक्का मारणे असा कार्यक्रम ठरविण्यात आला. तसेच रेल रोको आंदोलन केले. त्यामुळे सरकारने शेतकऱ्याची मागणी मान्य केली.[9]

शेतमालाला रास्त भाव दिला जात नसल्याने शेतकरी कर्जबाजारी झाले होते. त्यामुळे शेतकऱ्यांची कर्जमाफी सरकारने करावी यासाठी प्रयत्न सुरु ठेवले. यावेळी चळवळ आंदोलनाव्दारे न करता न्यायालयाच्या माध्यमातून कर्जमुक्ती मिळवायची संघटनेने ठरवली. संघटनेने गावोगावी कर्जमुक्तीचे अर्ज वाटून ते भरुन घेवून न्यायालयात दाखल केले. ही न्यायालयीन लढाई बरीच दिर्घकाळ चालली. त्यामुळे संघटनेने पाठिंबा दिलेल्या व्ही. पी. सिंग सरकारने कर्जमाफीची घोषणा केली.

एकंदरीत आंदोलनात आदिवासी व शेतमजूर वर्गाचा सहभाग नव्हता तर मध्यम व मोठा शेतकरी मोठया प्रमाणात सहभागी झाला होता. ही आंदोलने मुख्यता ऊस, कापुस, तंबाखु, कांदा यासारख्या नगदी पिकाच्या भावा

संबंधात झाली. ही आंदोलने विशेष करुन शासनाविरुध्द करण्यात आली. या चळवळीत संघटनेने नवनवी तंत्रे सतत वापरली. विशेष म्हणजे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सत्याग्रह तंत्राचा अवलंब केला.

1990 नंतर जागतिकीकरणाचे, उदारीकरणाचे वारे वाहू लागले. भारताने ही गॅट करारावर सही केली. जागतीकीकरणाचे व खुल्या अर्थव्यवस्थेचे शरद जोशीच्या शेतकरी संघटनेने स्वागत केले. प्रत्यक्षात जागतिकीकरण व बहुराष्ट्रीय कंपन्यामुळे भारतीय शेतकऱ्यासमोर नवा व अधिक भयंकर संकटे उभी राहिल्याचे वारंवार जाणवते. नव्या, खुल्या व उदार अर्थव्यवस्थेत शेतीमधील खर्च व उत्पन्नाचे गणित बिघडले. या संकटाची योग्य जाणीव सरकारला प्रारंभी झाली नाही. परिणामी शेतकऱ्यानी जगण्याची उमेद गमावली. 1997 पासून ते 2007 या काळात देशभरातील दीड लाखाहून अधिक शेतकऱ्याना आत्महत्या केल्या. त्यापैकी बहुसख्य आत्महत्या कर्जबाजारीपणा व नापिकीमुळे झाल्या होत्या. त्यातल्या सर्वाधीक आत्महत्या महाराष्ट्रात झाल्या.[11]

शेतकरी संघटनेने जागतिकीकरणात शेतकरी टिकावा म्हणून ''शिवार'' नावाच रिटेल नेटवर्क बघायला घेतले. ते काही प्रमाणात यशस्वी झाले. परंतू शेतकरी संघटनेचे भांडवल कमी पडल्यामुळे संघटनेला त्यामध्ये अपयश आले.[12] पुढे शेतकरी संघटनेत फुट पडून त्यानीलच एक कार्यकर्ता राजू शेट्टी यानी स्वाभीमानी शेतकरी संघटनेची सन 2002 मध्ये स्थापना केली.[13] त्यानी ऊस उत्पादकाला जागृत केले, ऊसाचा उत्पादन, खर्च, साखर कारखान्यातून तयार होणारे उपपदार्थ, जागतिक बाजार पेठेतील साखरेचे दर, आयात निर्यात बाबतचे सरकारचे धोरण, याबाबत परखड व अभ्यासू मांडणी करण्यास सुरूवात केली. त्यामुळे त्यास शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात पाठिंबा दिला.

जयसिंगपूर येथे ऊस परिषद घेवून संघटनेने शेतकऱ्यांच्या जागृती केली, तसेच त्यांच्यात आत्मसन्मानाची जाणीव करुन दिली. तसेच या परिषदेतच उसदराच्या पहिल्या उचलीची मागणी केली. त्यानुसार संघटनेने 2002 पासून अनुक्रमे प्रतिटन 460, 700, 1200, 1700, 2000, 2500 रुपयापर्यत पहिली उचल एक रकमी मागितली व ती मिळवण्यात संघटना यशस्वी ठरली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या आंदोलनाचे यश म्हणून ऊस दर मिळालाच शिवाय जनतेने जिल्हा परिषद सदस्य असणाऱ्या राजू शेट्टीं यांना सन 2004 च्या विधानसभेत निवडून दिले. लगेच झालेल्या जिल्हा परिषद , पंचायत समिती निवडणूकीतून संघटनेचे कार्यकर्ते निवडून आलेत.[14]

2005 ते 2007 च्या गळीत हंगामात ऊसदराच्या मुद्यावरून शेतकरी संघटना आणि कारखानदारामध्ये संघर्ष निर्माण झाला होता. याप्रकरणी राज्यातील जिल्हयाधिकाऱ्यांना शेतकरी संघटना व कारखानदार यांच्यात बैठकीवर बैठका घेतल्या पंरतू प्रश्न सूटला नाही. यावेळी दैनिक पुढारीचे संपादक प्रतापसिंग जाधव यांनी दैनिक पुढारीच्या कार्यालयात बैठक घेऊन हा प्रश्न सोडवला.[15]

2009 मध्ये संघटनेने ऊसाला प्रतिटन 3000 रूपये द्यावे अशी मागणी केली होती. त्यासाठी संघटनेने मोर्चा, आंदोलने , चक्का जाम इत्यादींचा अवलंब केला पंरतू कारखानदार 2000 रूपये सुध्दा देता येत नाही असे सांगत होते. पंरतु संघटनेच्या व जनरेटयाच्या दबावामुळे 2200 रूपये प्रतिटन दिला.[16]

2010 मध्ये संघटनेने ऊस दरासाठी व साखर निर्यात करण्यासाठी रेल रोको आंदोलन केले होते.सन 2011 मध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटनेने पाण्यावरील शेतीचा अग्रक्रम अबाधित रहावा यासाठी 30 एप्रिल ते 7 मे 2011 अशी संघर्षयात्रा संपूर्ण कोल्हापूर जिल्हयात काढण्यात आली. या संघर्षयात्रेचा मुळ हेतू म्हणजे पाण्याचा अग्रक्रम पिण्यासाठी , शेतीसाठी व उद्योगाधंद्यासाठी असाच राहीला पाहिजे. यावेळी पाणी उद्योग धंद्यांना देण्याचा शासनाचा डाव होता. तो मोडीत काढण्याचे काम प्राध्यापक डॉ. एन. डी पाटील व शेतकरी संघटनेने केला.[17]

शरद जोशी प्रेणीत शेतकरी संघटनेची सांगली येथे ऊस परिषद झाली. या परिषदेत ऊसाला पहिला हप्ता 2900 रूपये द्यावा. अशी मागणी केली. या परिषदेत रंगराजन समितीचा अहवाल सरकारने स्विकारावा अन्यथा याविरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. यावेळी संघटनेने जागतिक बाजारपेठेत ऊसाची टंचाई असल्याने ज्यादा दराचा मागणी केली होती. तसेच या परिषदेत साखर कारखान्यातील साखर गोदामाच्या बाहेर पडू न देण्याऱ्या निर्णय घेतला ऊसाला योग्य भाव मिळत नाही. तोपर्यंत तसेच सी. रंगराजन समितीच्या शिफारशी लागू होत नाहीत तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला या परिषदेत खालील ठराव करण्यात आले.[18]

1. गत हंगामातील योग्य दरासाठी जनहित याचिका
2.करारभंग केलेल्या कारखान्यांचे परवाने रोखावेत.
3.एफआरपी कालबाह्य ठरवून रंगराजन अहवाल स्विकारावा
4.साखर उद्योग कायमचेच नियंत्रणमुक्त करा.
5.गोळीबार प्रकरणाची सीबीआय चौकशी करा.

ऊसाला पहिला हप्ता 2350 रूपये प्रमाणे प्रतीटन मिळाला पाहिजे. अशी घोषणा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दहाव्या ऊस परिषदेत केली. संघटनेने 2 नोव्हेंबर 2011 पासून पंढरपूर ते बारामती अशी शेतकऱ्यांची पदयात्रा काढण्यात येणार असल्याची घोषणा केली होती. तरी सुध्दा सरकारने संघटनेच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे संघटनेने खासदार राजू शेट्टींच्या नेतृत्वाखाली 2 नोव्हेंबर ते 8 नोव्हेंबर अशी सहा दिवसांची पंढरपूर ते बारामती आत्मक्लेश यात्रा सुरू करून ऊस दर आंदोलनाला सुरूवात केली. बारामती येथे झालेल्या सांगता सभेत राजू शेट्टीं यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले. त्यामुळे केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांच्या बालोकिल्ल्यात प्रांतिक उपोषणाचे अस्त्र उपसून साऱ्या देशाचे लक्ष वेधून घेतले. त्यामुळे ऊस दराच्या प्रश्नाला संपूर्ण देशभरात प्रसिध्दी मिळून आंदोलनाला प्रंचड वेग प्राप्त झाला. राजू शेट्टीं यांनी उपोषणाचा मार्ग स्विकारल्यांनतर राज्यभरात शेतकरी संघटनांचे कार्यकर्त रस्त्यावर उतरले. अखेर सरकारने नमते घेत 11 नोव्हेंबर 2011 रोजी उसाला प्रतिटन 2050 अशी पहिली उचल जाहिर केली. त्यामुळे संघटनेला येथे प्रचंड यश मिळाले.[19] 2011 च्या गळीत हंगामात केद्र सरकारने साडे नऊ टक्के उताऱ्यासाठी 1445 रूपये एफआरपीनुसार दर निश्चीत केला. साडे नऊ टक्केच्या पुढील उताऱ्यासाठी दुसरा हप्ता ज्या त्या कारखानदारांनी द्यावा. असा निर्णय घेतला त्यामुळे शेतकरी संघटना शिवसेना, भाजपा ,मनसे, शेतकरी कामगार पक्ष इत्यादीं सर्व पक्षांनी सरकारच्या या धोरणेचां निषेध केला , तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेने 2350 रूपये , रघुनाथ दादा

यांच्या संघटनेने 2800 रूपये तर शिवसेनेने 2300 रूपये पहिली उचल दिल्या शिवाय कारखाने सुरू करू नयेत. असे अवाहन करून आंदोलने सुरू केलीत. [20]

ऊसाला पहिला हप्ता विनाकपात तीन हजार रूपये मिळाली पाहिजे अशी घोषणा 11 व्या ऊस परिषदेत स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली. यावेळी संघटना आक्रमक होऊन आंदोलनाचे केंद्र सहकार मंत्री यांच्या इंदापूरात केले. इंदापूरात ठिय्या आंदोलनास बसलेल्या खासदार राजू शेट्टी यांना अटक होताच पश्चिम महाराष्ट्रात उग्र व हिंसक आंदोलनास सुरुवात झाली. यामध्ये बसेस, पोलिस व्हॅन जाळपोळ झाली. त्यामुळे पोलिसांना केलेल्या गोळीबारात संघटनेचे दोन कार्यकर्ते ठार झाले. तर या पोलीस जखमी झाले. हजारो आंदोलक, कार्यकर्त यांना अटक करण्यात आले.

दिनांक 21 नोव्हेंबर 2012 रोजी शेतकरी संघटनेतील मतभेद मिटवून एकत्रीत लढा देण्यासाठी सांगली येथे ऊस परिषद झाली. या परिषदेला शरद जोशी, सदाभाऊ खोत, वामनराव लपट, सयाजी पाटील , विजय जावलिया , खंडेराव मोरे , लक्ष्मण वडले , शोभाताई वाघमारे , पाशा पटेल इ. उपस्थित होते.

सन 2013–2014 च्या गळीत हंगामासाठी ऊस दराची प्रतिटन पहिली उचल जाहिर करावी. अन्यथा साखर कारखाने सुरू करू न देण्याचा निर्णय शेतकरी संघटनांनी जाहीर केला . याबाबत साखर सम्राटांनी मौन पाळले. त्यामूळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेने ऊसाला प्रतिटन 3000 रूपये देण्याची मागणी केली . जागतिक बाजारपेठेत साखरेचे दर घसरल्यामुळे एफआरपी प्रमाणे 2013–2014 च्या हंगामासाठी 1530 रूपये प्रतिटन देण्याचा निर्णय शासनाने घेतला. म्हणजेच हा दर 2000 पेक्षा अधिक मिळणार नव्हता. त्यातच राज्यसहकारी बॅकेने पहिल्या उचलीसाठी उत्पादनांवर आधारित 85 टक्के रक्कम देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे शेतकऱ्यांच्यात मोठया प्रमाणावर असंतोष निर्माण झाला. महाराष्ट्राबरोबरच कर्नाटकातील शेतकऱ्यांनी पहिल्या उचलीसाठी प्रतिटन रूपये 3500 च्या मागणीसाठी आंदोलन केले. त्यातील एका आंदोलक शेतकऱ्याने आत्महत्या केल्यामुळे त्याची दखल कर्नाटक सरकारला घ्यावी लागली. त्यामुळे कर्नाटक सरकारने विना कपात 2650 रूपये प्रतिटन देण्याचा निर्णय जाहिर केला. परिणामी महाराष्ट्रातील शेतकरी संघटनांना बळ प्राप्त झाले.

संघटनेने पहिल्या उचलीसाठी आंदोलनाची व्याप्ती वाढविले त्यातच सर्व शेतकरी संघटना , शिवसेना , भाजप व मनसे या आंदोलनात उतरल्यामुळे आंदोलनाची तीव्रता वाढली. यावेळी संघटनांनी सी. रंगराजन समितीच्या शिफारशीची त्वरीत अंमलबजावणी करावी. व प्रतिटन 3000 रूपये पहिली उचल मिळावी यासाठी आंदोलन सुरू केले. यावेळी संघटनेने आंदोलनाचे केंद्राचे ठिकाण म्हणून मुख्यमंत्री यांचे गांव कराड निवडले . आंदोलनाची तीव्रता वाढून आंदोलनाला हिंसक वळण लागले. परिणामी शासनाच्या मालमत्तेचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले. आंदोलनाचे स्वरूप रास्ता रोको, रेल रोको , एसटी महामंडळाच्या गाडया , ऊसकरी शेतकऱ्यांच्या गाडया फोडणे, जाळपोळ असे होते. आंदोलनाची तीव्रता वाढताच राज्य सरकारला त्याची दखल घेणे भाग पडले. राज्यातील सर्व पक्षांच्या व संघटनांच्या प्रतिनीधींचे एक शिष्टमंडळ पंतप्रधांनानां भेटले. पंतप्रधांनांनी कृषी मंत्र्यांच्या नेतृत्वाखाली त्रिसमिती नेमली. या समितीमध्ये कृषीमंत्री , अर्थमंत्री तसेच अन्न व नागरी पुरवठा मंत्री होते. या समितीने तत्काळ 4 दिवसात अहवाल दिला. त्यानुसार 20 नोव्हेंबर 2013 रोजी केंद्रीय मंत्रीगटाची बैठक झाली. याबैठकीत ऊस खरेदी कर माफ करण्याचा निर्णय घेतला.[21]

परंतु , मंत्रीगटाच्या निर्णयांने संघटनेचे समाधान झाले नाही. परंतु सरकारच्या निर्णयाची वाट न पाहता संघटनेने 2650 रूपये च्या दरावर समाधान माणून ऊस दर आंदोलन स्थगित केले. एकंदरीत 1980 पासून शेतकरी संघटनेच्या मागण्यांमध्ये प्रामुख्याने ऊस दराचा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्यासाठी ऊस दर नियामक मंडळाची स्थापना , लेव्ही रदद करून सरकारने खुल्या बाजारातून साखर खरेदी करावी. ऊसा पासून तयार होणाऱ्या अल्कोहोलचे मिश्रण पेट्रोल व डिझेल मध्ये 10 टक्के करावे. साखर उद्योगावरील परचेस कमी करावा. मळीवरील बंदी उठवावी, रंगराजन समितीचा अहवाल स्विकारावा , ऊसाला उत्पादन खर्चावर हमीभाव मिळावा, साखर निर्यात अनुदान वाढविणे, ऊसावरील खरेदी कर माफ करावा , साखर उद्योग नियंत्रण मुक्त करावा. इत्यादींचा समावेश होता. यासाठी संघटनेबरोबरच साखर संम्राटांनी आंदोलनात उतरावे अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती. एकदंरीत 2013–2014 च्या हंगामात निवडणुका आल्याने सर्वच पक्षांनी शेतकऱ्यांच्या आंदोलनाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पांठिबा दिला. काही मागण्या मान्य करून घेण्यात संघटना यशस्वी झाली.

### *संदर्भ साधने*


1.महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई 2011.
2.Ibid
3.http//www.baliraja.com
4.Ibid
5.swabhimani vichar editor web http//164
6.मुलाखत–श्री. जालिंदर पाटील अध्यक्ष शेतकरी संघटना, कोल्हापूर दि. 14/5/2012 वेळ दुपारी 4.00 वाजता.
7.http//www.baliraja.com
8.Ibid
9.महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई – 2011.
10.Ibid
11.http//www.baliraja.com
12.महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई – 2011
13.http//www.baliraja.com
14.Ibid

15.Ibid
16.Interview - श्री. जालिंदर पाटील अध्यक्ष शेतकरी संघटना, कोल्हापूर दुपारी 4.00 वाजता
17.दै. पुढारी–लेख राजू शेट्टी दिनांक 08/01/2014 पान नं. 3
18.स्वाभिमानी विचार म्कपजवत् मइ ीजजच 11 164
19.दै. पुढारी – 8 मे 2011, पान नं. 1–3
20.दै. सकाळ – 21 नोव्हेंबर 2012, पान नं. 1
21.दै. पुढारी – 21 नोव्हेंबर 2013